मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# वक्तृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्व यांचा त्रिवेणी संगम प्रभाग २५ च्या विकासासाठी भारतीताई विनोदे सज्ज

## विकसनशील प्रभाग : 25

**पिंपरी | प्रतिनीधी : पिंपरी-चिंचवडच्या राजकीय पटलावर केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कृतीवर विश्वास ठेवणारे नेतृत्व म्हणून भारतीताई विनोदे यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. २०१४ मध्ये स्वर्गीय आमदार लक्ष्मण जगताप यांच्या विचारांनी प्रेरित होऊन भारतीय जनता पक्षात प्रवेश केलेल्या भारतीताईंनी अल्पावधीतच आपल्या कामाचा ठसा उमटवला. ताईंच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वातील नेतृत्व गुण ओळखून जगताप यांनी त्यांच्यावर चिंचवड-किवळे महिला अध्यक्षपदाची मोठी जबाबदारी सोपवली. इथूनच त्यांच्या सार्वजनिक जीवनातील खऱ्या प्रवासाला सुरुवात झाली आणि आज त्या प्रभागाच्या हक्काच्या 'ताई' म्हणून ओळखल्या जात आहेत.**











भारतीताई या व्यवस्थापन क्षेत्रातील पदवीधर आहेत. त्यांच्या शिक्षणाचा आणि व्यवस्थापकीय दृष्टिकोनाचा फायदा त्यांना सार्वजनिक समस्या सोडवताना प्रकर्षाने झाला. विद्युत वितरण समितीच्या सदस्य म्हणून काम करताना त्यांनी नागरिकांच्या वीजविषयक समस्यांना प्राधान्य दिले. भूमिगत केबल बसवणे, नादुरुस्त यंत्रणा सुधारणे आणि नवीन जोडणी सुलभ करणे यांसारखी तांत्रिक कामे त्यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने मार्गी लावली. पुढे जिल्हा नियोजन समिती आणि जिल्हा महिला मोर्चाच्या माध्यमातून त्यांनी केवळ शहरापुरते मर्यादित न राहता जिल्ह्याच्या स्तरावर महिलांचे प्रश्न आणि रस्ते विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात यश मिळवले.



भारतीताईंचा सामाजिक कार्याचा आलेख हा संवेदनशीलतेने भरलेला आहे. कोरोनाच्या भीषण संकटात जेव्हा जग थांबले होते, तेव्हा त्या रस्त्यावर उतरून कामगारांना अन्नधान्य वाटप करत होत्या. आरोग्य शिबिरे, ज्येष्ठ नागरिकांसाठी नेत्र तपासणी, वारकऱ्यांचा सन्मान आणि वेदपाठशाळेला मदत यांसारख्या उपक्रमांतून त्यांनी समाजाच्या प्रत्येक घटकाशी जवळीक साधली. विशेषतः त्यांनी तृतीयपंथींचा सत्कार केला. यातून समाजाप्रती असणारी त्यांची संवेदनशीलता आणि वंचित दुर्लक्षित घटकापर्यंत पोहोचण्याची त्यांची तळमळ दिसली. शिक्षण आणि रोजगारासाठी त्यांनी आयोजित केलेली शिबिर तरुण पिढीला दिशा देणारी ठरली आहेत. लाठी काठी प्रशिक्षण शिबिरातून त्यांनी महिलांच्या संरक्षणाच्या दिशेने मोठे पाऊल उचलले आहे.

प्रभागाच्या भविष्याबद्दल बोलताना भारतीताईंच्या मनात एक स्पष्ट आराखडा आहे. सध्या भेडसावणारी वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी त्या सूक्ष्म अभ्यासावर भर देतात. आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली या समस्येचे कायमस्वरूपी निवारण करण्यासाठी आवश्यक तिथे भुयारी मार्ग काढणे, अनावश्यक भुयारी मार्ग बंद करणे, सर्विस रस्ता विकसित करणे आणि गरज असल्यास एकेरी वाहतूक ठेवणे यासारख्या उपाययोजनातून वाहतुकीचे योग्य नियोजन करण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे. केवळ रस्ते आणि पाणी एवढ्यापुरते मर्यादित न राहता, आजूबाजूच्या आयटी हबचा विचार करून महिला सक्षमीकरणाचे एक 'आंतरराष्ट्रीय केंद्र' उभारण्याचे त्यांचे स्वप्न आहे. या केंद्रात महिलांना स्वसंरक्षणासाठी शिवकालीन लाठी-काठीचे प्रशिक्षण देण्याची त्यांची संकल्पना आहे. तसेच नोकरी करणाऱ्या महिलांच्या लहान मुलांसाठी सुरक्षित 'बालसंगोपन केंद्र' उभारून एक आधुनिक आणि सुरक्षित प्रभाग निर्माण करण्याचा त्यांचा मानस आहे.

दांडगा जनसंपर्क, प्रशासकीय कामांवरील पकड आणि व्यवस्थापनाची पदवी यामुळे भारतीताईंकडे कोणत्याही समस्येकडे पाहण्याचा एक वेगळा 'कॉर्पोरेट' आणि 'सामाजिक' असा समतोल दृष्टिकोन आहे. आमदार शंकर जगताप आणि शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांचे मार्गदर्शनाने प्रभाग २५ च्या कायापालटाचा संकल्प केला आहे. नागरिकांच्या समस्या सभागृहात निर्भीडपणे मांडण्यासाठी भारतीताई विनोदे यांच्यासारख्या सुशिक्षित आणि अनुभवी नेतृत्वाची आज प्रभागाला गरज आहे. जनतेच्या विश्वासाला सार्थ ठरवत विकासाचा नवा अध्याय लिहिण्यासाठी त्या आता लोकप्रतिनिधी म्हणून जनसेवेच्या रिंगणात उतरण्यास सज्ज आहेत.




